**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ६५०१ / २०२३/ सांगली

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| रमजान नबीलाल खलीफा | वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र नांद्रे, कवठेपिरान व भोसे | तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती मिरज, जि.सांगली |

**( सुनावणी दिनांक - १८/०६ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.२०.१०.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, अपूरी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी ऑनलाईन हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.२२.०६.२०२३ च्या माहिती अर्जात "रुग्ण कल्याण समिती जनकल्याण समिती बाबत नमुद सर्व माहिती मागितलेली आहे."

सुनवणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, "मला माहिती मिळाली नाही."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम व विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना नक्की कोणती माहिती हवी आहे याचा अर्थ बोध होत नाही. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ)

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ६५०१ / २०२३ / सांगली 9124/2025

दिनांक - 2/9/2025